दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २६३ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.६ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### शासकीय योजनेतून मतं खरेदी करण्याचा केविलवाणा प्रयत्न

**मुंबई–**शासकीय योजनेतून मतं खरेदी करण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे असे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे. आमच्या बहिणी यांना भीक घालणार नाहीत असेही ते म्हणाले. आज पावसाळी अधिवेशनाच्या आधी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी ते बोलत होते.याबाबत बोलतांना विजय वडेट्टीवार म्हणाले, ''लाडकी बहिण योजना जरी काढली असेल तरी या सरकारला बहिणी मतदान देणार नाही. शासकीय योजनेतून मत खरेदी करण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. आमच्या बहिणी यांना भीक घालणार नाहीत. ही सद्बुद्धी त्यांना वर्षभरापूर्वी का सुचली नाही? निवडणुकीच्या तोंडावरच का सुचली? यातून काही निष्पन्न होणार नाही'', असे वडेट्टीवार यांनी म्हंटले आहे.

### दुधाला ५ तर पावडरलाही ३० रुपये अनुदान

**मुंबई–**राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३० रुपये आणि पाच रुपयांचे अनुदान देण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाला मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली असल्याची माहीती पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. १ जुलै पासून हे दर लागू होणार असून, दूध पावडरसाठी प्रतिकीलो ३० रुपये अनुदान देण्यावरही आजच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी राज्यभरातील सहकारी तथा खासगी दूध उत्पादक संघ, आणि दूध उत्पादक शेतकरी यांची तातडीची बैठक मंत्रालयात बोलावली होती.सदर बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी दूध उत्पादक शेतकरी, आणि दूध संघाच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांच्या मागण्या विचारात घेता राज्यातील सर्व खासगी तथा सहकारी दूध संघाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३० रु. भाव देण्याचे सर्वानुमते निश्चित केल्याचे सभागृहाला सांगितले.

### राज्यात पुढील ५ दिवस तुफान पाऊस

**पुणे–**राज्यात जून महिन्यात काहीशी विश्रांती घेतलेला पाऊस जुलै महिन्यात सक्रीय झाला आहे. राज्यात पुढील पाच दिवस जोरदार पाऊस बसरणार आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढचे पाच दिवस विदर्भ, मध्य महाराष्ट्र, खानदेश आणि कोकणामध्ये सर्वाधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. तर मराठवाडामध्ये मात्र मध्यम पावसाचा अंदाज आहे.

दक्षिण गुजरात ते कर्नाटक किनारपट्टीवर हवेच्या कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांसह विविध भागात पुढील ५ दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील ५ दिवस किनारपट्टी आणि पश्चिम घाटाच्या परिसरात चांगला पाऊस होईल. तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे.मराठवाड्यात १० जुलैपर्यंत जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर या जिल्ह्यांत मध्यम तर छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्ह्यात किरकोळ पावसाची शक्यता आहे. तर पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांत तसेच नाशिक जिल्ह्यात शुक्रवारपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे.

तसेच हवामान खात्याने आज शुक्रवारसाठी सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागात दमदार पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे मुंबई, पुणे, ठाणे, पालघरसह कोकण किनारपट्टी भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भातील वर्धा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये वादळी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची लूट पीकविम्याचे धोरण बदला–नाना पटोले

## क्रिकेट संघाच्या मिरवणुकीवरुन सरकारवर टीका



**मुंबई (वृत्तसंस्था)–राज्यातील शेतकरी संकटात असताना पीकविमा कंपन्या आपले उखळ पांढरे करून घेत असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी येथे पत्रकारांशी बोलताना केला. सरकारने कंपन्यांकडून होणारी लूट थांबवून शेतकरी हिताचे धोरण तयार करावे, अशी मागणी त्यांनी या प्रकरणी केली.पावसाने ओढ दिल्यामुळे राज्यात दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. पण त्यानंतरही शेतकऱ्यांना सरकारकडून मदत मिळत नाही. त्यातच पीकविमा कंपन्या शेतकऱ्यांच्या जीवावर आपले खिसे भरत आहेत. सरकारही या कंपन्या व मोदींच्या मित्रांबरोबर आहे. सद्यस्थितीत महसूल विभागाची वेबसाईट बंद आहे. या वेबसाईटवर नोंद झाल्याशिवाय पीकविमा मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची लूट करणारे हे पीकविमा धोरण बदलून शेतकरी हिताचे धोरण बनवा, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे.**

नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, मागासवर्गीय मुलांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न आहे. ओबीसी मुलांना ५ वर्षांपासून शिष्यवृत्ती दिली जात नाही. ओबीसी समाजाच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे व शेतीपासून बरबाद करायचे हे काम भाजप सरकार करत आहे. सरकारच्या अशा चुकीच्या धोरणांविरोधात आमचा लढा सुरु आहे. शेतकरी, ओबीसी, आदिवासी, एससी, एसटी समाजाच्या हितासाठी काँग्रेस पक्षाचा लढा आहे, असे नाना पटोले म्हणाले.

शेतकरी दुष्काळाचा सामना करत असतानाही शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळत नाही. सरकार ऐकायला तयार नाही. महाराष्ट्रात रोज ४ शेतकरी आत्महत्या होत आहेत. अधिवेशन काळातही या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. शेतकरी जगला तर देश जगेल म्हणूनच संकटातील शेतकऱ्याला आधार देण्यासाठी सरसकट कर्ज माफी जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. या सरकारला शेतकऱ्यांचे हित साधायचे नाही, भाजपाप्रणित शिंदे सरकार हे शेतकरी विरोधी आहे, अशी टीकाही नाना पटोले यांनी यावेळी केली.नाना पटोले यांनी यावेळी टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाच्या मिरवणुकीसाठी गुजरातची बस वापरण्याच्या मुद्यावरूनही राज्य सरकारवर निशाणा साधला. राज्यातील महायुतीचे सरकार हे गुजरातधार्जिणे आहे, मोदी-शहांना ते त्यांचा आका मानतात. बेस्टकडे चांगल्या दर्जाची ओपन बस असताना वर्ल्डकप विजेत्या खेळाडूंच्या मिरवणुकीसाठी गुजरातमधून बस आणणे हा खेळाडूंचा अपमान आहे. दिल्लीच्या आदेशावरून गुजरातची बस मुंबईत आणली असावी. खेळाडूंचे कौतुक केले पाहिजे, पण त्यासाठी गुजरात समोर झुकण्याची गरज नव्हती, असे नाना पटोले म्हणाले.

## विरूळ(रोंघे)येथील एकाच कुटुंबातील दोन मुलींचा अंत



**पुलगाव । प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तालुक्यातील विरुळ रोंघे येथे खुप मोठी हृदय हेलावुन टाकणारी दुःखत घटना घडली.साव कुटुंबातील एकाच घरातील दोन सख्या भावांच्या मुलींचे दुःखद निधन झाले

विरुळ रोंघे येथिल प्रविण साव यांची मुलगी कु.नंदीनी साव( वय १०वर्ष) व राजेश साव यांची मुलगी कु.चैताली साव (वय ११वर्षे ) ह्या दोन्ही मुलीचे दि. ५ जुलैला पहाटे अचानक निधन झाले व उर्वरित दोन मुलांवर उपचार चालु आहे.चि.देवाश राजेश साव व चि.भक्ती प्रविण साव यांच्यावर धामणगाव रेल्वे येथे डॉ अम्रुरकर यांच्या कडे उपचार चालु आहे.अशी घटना ही नेमकी कशामुळे झाली? हे अजुनही नेमक समजलं नाही.त्या बाबत पोलीस स्टेशन, आरोग्य विभाग,महसुल विभाग हे घटनास्थळी पोहचत आहे.नेमकं कशामुळे झाल? हे चौकशी अंती सत्य माहीत पडेल.अश्या दोन

चिमुकल्या अचानक मृत्यु पावल्यामुळे साव कुटुंबासहीत संपुर्ण विरुळ गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन मुलांच्या तब्येती मध्ये सुधार व्हावा म्हणून प्रयत्न सुरु आहे.दोन मुलींवर दि. ५ ला दुपार नंतर अंत्यसंस्कार करण्यात आले.दुषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे अतिसार होऊन मुली दगावल्या असाव्या, असा प्राथमिक अंदाज आहे. आ. प्रताप अडसड यांनी विधानसभेत याची माहिती देऊन चौकशी करण्याची मागणी केली. पिडीत परिवाराला मदत करण्याची मागणी केली.

## अंध,अपंगांना संसार उपयोगी साहित्याची मदत

### मंगेश पोटवार यांचा पुढाकार वाढदिवसाचे औचित्य







**मूल । प्रतिनिधी**

आधुनिकतेच्या युगात श्रिमंतीचा थाट दाखविण्याकरिता कार्यक्रमातून स्पर्धा होत असतानाच गरिबीची ठिगळं लावून दोन वेळच्या जेवणासाठी भ्रमंती करणारी व अपंगत्वाने हतबल होत हलाखीचे जीवन जगणाऱ्यांची संख्या कमी नाही.मात्र याही परिस्थितीत सामाजिक ऋण फेडण्याच्या उद्देशाने मदतीची हाक देणारे क्वचितच !

आपला वाढदिवसाच्या औचित्य साधून मुल येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मंगेश पोटवार यांनी पुढाकार घेत यावेळी मूल येथील अशोक उमाजी टेकाम यांना महिनाभर पुरेल असा किराणा , तालुक्यातील टेकाडी येथील अंध गीता प्रेमदास घडसे यांना किराणा तर टेकाडी येथील ताराबाई कान्होजी लोणबले यांना पंखा भेट म्हणून दिला.मंगेश पोटवार यांनी यापूर्वी अनेकांना मदत केली आहे.आपल्या वाढदिवशी अनाथ अपंग वंचितांची मदत करून सेवा करता यावी म्हणून पोटवार यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीने तिन्ही कुटुंबाना मदत मिळाली असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार, शहराध्यक्ष आकाश येसनकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक अध्यक्ष रोहित कामडे,प्रशांत मेश्राम,महेंद्र कोडापे, आनंदराव गोहने, किसन गुरुनुले, सुनिल कामडी आदी उपस्थित होते.

## गोंड गोवारी समाजाचे लेखी निवेदने;१५ व १६ जुलै रोजी सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील गोंड गोवारी समाजाच्या निवेदनावर अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्ती न्यायाधीश के.एल. वडणे यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. गोंड गोवारी समाजाच्या संबंधित संघटनेचे प्रतिनिधी हे समितीसमोर आपले संक्षिप्त लेखी निवेदन सादर करू शकतील. निवेदन हे टंकलिखीत व वाचनीय असणे आवश्यक आहे. तसेच संघटनेतील प्रतिनिधीला थोडक्यात आपले म्हणने मांडण्यासाठी संधी देण्यात येईल.


दिनांक १५ व १६ जुलै २०२४ रोजी रविभवन शासकीय विश्रामगृह, नागपूर येथे सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत तर १८ ते २० जुलै २०२४ रोजी शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे गोंड गोवारी समाज बांधव /प्रतिनिधी/संस्था यांनी सदर दिनांकास उपस्थित राहून निवेदने सादर करावी, असे आवाहन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त यांनी केल्याचे सहआयुक्त तथा अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे उपाध्यक्ष विनोद पाटील यांनी कळविले आहे.

## चिमुर मधील राजूला तीस वर्षा नंतर भेटणार हक्काच घर

**चिमूर । प्रतिनिधी**

मनोरुग्णांची सेवा म्हणजे एक मोठे आव्हानच आहे. परंतु तालुका चिमूर जिल्हा चंद्रपूर येथील शुभम पसारकर या युवा देवदूताने हे आव्हान स्वीकारले आहे. त्याने मनोरुग्णांच्या सेवेत स्वतःला झोकावून दिले आहे. व आता शुभम मनोरुग्णाच्या आशेच्या किरण ठरला आहे. त्याच्या या कार्यामुळे जिवंतपणे नरकायातना सहन करणाऱ्या मनोरुग्णांना जगण्याची नवीन उम्मीद मिळाली आहे. अशा मनोरुग्णांना आता शुभम पसारकर यांचे दिव्य वंदना आधार फाउंडेशन जामगाव भिशी येथे दिवाळीनंतर निवासाची सोय उपलब्ध करून देत आहे. ४ महिन्या पुर्वी दिव्यवंदना आधार फाउंडेशन चे अध्यक्ष शुभम पसारकर यानी मनोरुग्न राजू ३० वर्षा पासून रोडवरती रहायचा प्रादेशिक मनोरुग्णालय येथे २ महिने उपचार करीता पाठवीन्यात आले. उपचार झाल्या नंतर राजूची कुठेही राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे सह्याद्री फाउंडेशन चे अध्यक्ष देवेंद्र क्षीरसागर यानी आस्था निवारा गृह नागपुर येथे ६ महीने राजू ची उपचाराची राहण्याची ,जेवनाची जिम्मेदारी घेतली आहे .दिवाळीनंतर राजू ला दिव्यवंदना आधार फाउंडेशन हक्काच घर देणार असे दिव्यवंदना आधार फाउंडेशन चे अध्यक्ष शुभम पसारकर यानी सांगितले.

दिव्यवंदना आधार फाउंडेशन द्वारा संचालित रोडवरील बेघर, बेवारस, भिक्षेकरी, अनाथ, निराधार, यांना मनोरुग्ण केंद्र जामगाव भिसी तालुका चिमूर जिल्हा चंद्रपूर येथे त्यांचे निवास केंद्र बनत आहे. त्यांना येथे उपचार मिळेल, निवारा मिळेल, खाण्यापिण्याची निशुल्क व्यवस्था मिळेल, मनोरंजन कक्ष, समोपदेशन कक्ष, आरोग्य तपासणी कक्ष, औषधोपचार, सुरक्षा व्यवस्था इत्यादी सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निवारामधील गरजू लोकांना साधनांची सुविधा , उपलब्ध करुन देणार असून त्यात ट्यूबलाइट, पंखे, वॉश बेसिन, स्वयंपाक गृह, वॉटर प्युरिफायर, सीसीटीव्ही कॅमेरा, रुग्णवाहिका, मनोरंजन साधने, प्रथमोपचार किट, टेलिव्हिजन, कॅरम बोर्ड, चेस, बॅडमिंटन इत्यादी. दोन वेळा चहा, सकाळी ७ वाजता सायंकाळी सायंकाळी, एक वेळचा नाश्ता सकाळी ९ वाजता, दुपारी दोन वाजता जेवण सकाळी १२ वाजता व रात्री ८ वाजता निवाऱ्यामधील राहणाऱ्या लोकांना निशुल्क गरजेच्या वस्तू टूथपेस्ट, मंजन, साबण, अंतरवस्त्र, बिछायत, चादर , ब्लँकेट, तेल, कपडे,



चप्पल इत्यादी गरजु लोकांना पुरवण्यात येणार आहे . कुठल्या प्रकारचे शासकीय अनुदान नसतानाही दिव्यवंदना आधार फाउंडेशन पूर्ण महाराष्ट्र करिता महान कार्य करीत आहे. जामगाव को. भिसी येथे या लोकांच्या हक्काचे निवारा केंद्र बनत आहे.


भविष्यात सेवेचे नियोजन एका वेळेस ४०० बेघर, बेवारस, भिक्षेकरी,अनाथ, मनोरुग्ण, लोकाची सेवा करण्याचा त्यांचा मानस आहे. मानसिक आरोग्यबाबत असलेल्या गैरसमज दूर करण्यासाठी मोठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून विदर्भात कुठेही मनोरुग्ण आढळला तर शुभम ला फोन येतात . मनोरुग्ण कितीही आक्रमक असो त्याला शांत करून सोबत नेण्याची कला आता शुभम ला चांगलीच अवगत झाली आहे. आजवर शुभमने ४०० हून अधिक मनोरुग्णांना नागपूर येथे उपचारा करीता पाठवले आहे. अनेकांना बरे करून त्यांच्या घरी सुद्धा पाठवले आहे. दिवाळीनंतर दिव्यवंदना आधार फाउंडेशनचे अध्यक्ष शुभम पसारकर यांनी रोडवरील बेघर, बेवारस, भिक्षकरी , अनाथ, मनोरुग्ण लोकांना हक्काचा घर देण्याचा मानस आहे. त्याच्या या कार्याची दखल समाजातील समाजसेवकांनी तसेच युवकांनी घेऊन या कार्यासाठी मदत करण्याचे आव्हानही त्यांच्याकडून करण्यात आले आहे.

# कूप्स डे म्हणजेच आंतरराष्ट्रीय सहकार दिन!

**दि.१६ डिसेंबर १९९२ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव ४७/९० मध्ये घोषित केले. जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस म्हणून घोषित केला गेला, जो आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या स्थापनेच्या शताब्दी निमित्त आहे. सन १९९५पासून संयुक्त राष्ट्रसंघाचा आंतरराष्ट्रीय सहकारी दिन संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय सहकाराच्या पुढाकाराने साजरा होऊ लागला. आंतरराष्ट्रीय सहकारी दिन हा सन १९२३पासून आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीद्वारे जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी साजरा केला जाणारा सहकारी चळवळीचा वार्षिक उत्सव आहे. ही रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखातून जाणून घेउया... संपादक**

जगभरातील सहकारी संस्था हा दिवस विविध पद्धतीने साजरा करतात आणि दरवर्षी आयोजक संस्था उत्सवासाठी एका थीमवर सहमत असतात. बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर क्शनच्या १५व्या वर्धापन दिनानिमित्त सन २०१०ची थीम कोऑपरेटिव्ह एंटरप्राइज महिलांना सक्षम बनवते, अशी होती. यावर्षी ६ जुलै हा दिवस सहकार चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी साजरा केला जात आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी सहकार संस्था सामंजस्याने कशा प्रकारे कार्य करतात याबद्दलही या निमित्ताने जनजागृती केली जाते.

युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली-युएनजीएने दि.१६ डिसेंबर १९९२ रोजी जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकार दिन म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या स्थापनेची शताब्दी म्हणून ही तारीख निवडण्यात आली. याला कूप्स डे असेही म्हणतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन, आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीची स्थापना आणि जगाला एक चांगले स्थान बनवण्याच्या दिशेने सहकार संस्था कशा प्रकारे कार्य करतात, याचा उत्सव साजरा करतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन उपक्रम आणि चर्चा आयोजित करून साजरा केला जातो. यामध्ये विविध सहकार संस्थांचे कार्य दर्शविणाऱ्या लघुपटांच्या स्क्रीनिंगचा समावेश आहे.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

या दिवशी रेडिओ कार्यक्रम, वर्तमानपत्रे आणि इतर विविध माध्यमांचा वापर या क्षेत्रातील उपलब्धींवर प्रकाश टाकण्यासाठी केला जातो. सामुदायिक स्तरावर त्यांचे लक्ष असूनही, सहकारी संस्था त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक मॉडेलचे फायदे जगभरातील लोकांपर्यंत पोहोचवण्याची आकांक्षा बाळगतात. त्यांच्या मते, जागतिकीकरणामुळे वाढलेली संसाधनांची असमानता, संपत्तीचे अधिक शाश्वत वितरण होण्यासाठी मूल्यांच्या संचाद्वारे नियंत्रित करणे आवश्यक आहे.

सहकार चळवळ ही लोकशाही आणि स्थानिक पातळीवर स्वायत्त आहे. त्याच वेळी, सहकार संस्थांना जागतिक स्तरावर संघटना आणि उपक्रमांची संघटना म्हणून एकत्रित केले जाते जेथे नागरिक सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वयं-मदतीवर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिनाची मूल्ये अशी- सहकार संस्था स्वयं-जबाबदारी, लोकशाही, समानता, स्वायत्ता, स्व-मदत आणि एकता यांसारख्या अनेक मूल्यांचे पालन करतात. ही तत्त्वे त्यांच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक आहेत.सहकार चळवळ ही लोकशाही आणि स्थानिक पातळीवर स्वायत्त आहे. त्याच वेळी, सहकार संस्थांना जागतिक स्तरावर संघटना आणि उपक्रमांची संघटना म्हणून एकत्रित केले जाते जेथे नागरिक सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वयं-मदतीवर अवलंबून असतात.

!! विश्व सहकारी दिन निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!



# ज्येष्ठ नागरिकांची व्यथा

सरकारने सर्व ज्येष्ठ नागरिकांना वयाच्या ६५ व्या वर्षी मारून टाकावे. कारण या राष्ट्रनिर्मात्यांकडे सरकार लक्ष द्यायला तयार नाही. हा मुद्दा माननीय खासदार श्रीमती जया बच्चन जी यांनी संसदेतही उपस्थित केला होता.

भारतात ज्येष्ठ नागरिक असणे हा गुन्हा आहे का?




भारतातील ज्येष्ठ नागरिक ७० वर्षांनंतर वैद्यकीय विम्यासाठी पात्र नाहीत, त्यांना मासिक हप्त्यावर कर्ज मिळत नाही. वाहन चालविण्याचा परवाना दिला जात नाही. त्यांना उत्पन्नासाठी कोणतेही काम दिले जात नाही. त्यामुळे ते जगण्यासाठी इतरांवर अवलंबून असतात.त्यांनी सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत म्हणजेच ६०-६५ पर्यंतचे सर्व टॅक्स, विमा प्रीमियम भरले होते. आता ज्येष्ठ नागरिक झाल्यानंतरही त्यांना सर्व कर भरावे लागतात. भारतात ज्येष्ठ नागरिकांसाठी कोणतीही योजना नाही. रेल्वेवरील ५० टक्के सवलतही बंद करण्यात आली आहे. उलट दुसरी बाजू अशी आहे की राजकारणातील ज्येष्ठ नागरिक आमदार, खासदार किंवा मंत्री यांना शक्य ते सर्व लाभ दिले जातात आणि त्यांना पेन्शनही मिळते. इतर सर्वांना (काही सरकारी कर्मचारी सोडून) समान सुविधा का नाकारल्या जातात हे मला समजत नाही. कल्पना करा, जर मुले त्यांची काळजी घेत नसतील तर ते कुठे जातील. ही एक भयानक आणि वेदनादायक समस्या आहे. देशातील वडीलधारी मंडळी नाराज होऊन निवडणुकीत सरकारच्या विरोधात गेल्यास त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावर होईल. सरकारला त्याचे परिणाम भोगावे लागतील.ज्येष्ठांच्या सुविधांबाबत सर्व राजकीय पक्षांना निवडणूक जाहीरनाम्यात घोषणा करावी लागणार आहे.

सरकार बदलण्याची ताकद वरिष्ठांकडे आहे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यांच्याकडे सरकार बदलण्याचा आयुष्यभराचा अनुभव आहे. कृपया त्यांना कमकुवत समजू नका! ज्येष्ठांच्या फायद्यासाठी अनेक योजनांची गरज आहे. सरकार कल्याणकारी योजनांवर भरपूर पैसा खर्च करते, मात्र ज्येष्ठ नागरिकांची कधीच जाणीव होत नाही. उलट बँकांचे व्याजदर कमी झाल्याने ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न घटत आहे. जर त्यांच्यापैकी काहींना कुटुंब आणि स्वत: च्या उदरनिर्वाहासाठी तुटपुंजे पेन्शन मिळत असेल तर ते देखील आयकराच्या अधीन आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचा काही फायद्यांचा विचार केला पाहिजे

१) ६० वर्षावरील सर्व नागरिकांना पेन्शन मिळणे आवश्यक आहे.

२) किंवा दोन वेळ पोषण आहार

३)रेल्वे, बस आणि विमान प्रवासात सवलत देणे आवश्यक आहे.

४) शेवटच्या श्वासापर्यंत सर्वांसाठी विमा असणे आहे आणि प्रीमियम सरकारद्वारे भरणे आवश्यक आहे किंवा मोफत उपचार आवश्यक

५)ज्येष्ठ नागरिकांच्या न्यायालयीन खटल्यांचा लवकर निर्णय घेण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे.

६)प्रत्येक शहरात सर्व सुविधांसह ज्येष्ठ नागरिकांची घरे

७) सरकारने १०-१५ वर्षे जुन्या वापरलेल्या गाड्या स्क्रॅप करण्याच्या नियमात सुधारणा करावी. हा नियम फक्त व्यावसायिक वाहनांसाठी लागू केला जावा. ही वस्तुस्थिती सरकारला माहित असणे आवश्यक आहे. आमच्या कार कर्जावर खरेदी केल्या आहेत आणि आमचे उपयोग १० वर्षात फक्त ४० ते ५०००० किमी आहेत.आमच्या गाड्या नवीन सारख्या चांगल्या आहेत. जर आमच्या गाड्या स्क्रॅप झाल्या असतील तर आम्हाला नवीन गाड्या दिल्या पाहिजेत. मी देशातील सर्व वरिष्ठ नागरिक आणि तरुणांना विनंती करतो की त्यांनी ती सर्व सोशल मीडियावर शेअर करावी. ज्येष्ठ नागरिकांचा आवाज सरकारच्या कानापर्यंत पोहोचवूया. ज्येष्ठांचा न ऐकलेला आवाज एक जनआंदोलन बनवावे अशी माझी इच्छा आहे जेणेकरून आपल्या महान देशात सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांचा योग्य आदर आणि सन्मान मिळाला पाहिजेच.

**स्मार्ट लाईफ फाउंडेशन,मुंबई.**

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पिकस्पर्धा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यात येतात. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा गौरव केल्यास आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर होण्यास मदत होईल. प्रगतशील शेतक-यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना झाल्यास राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, रागी, तुर, सोयाबिन, भुईमुंग व सुर्यफुल या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेची ठळक वैशिष्टे व बाबी : पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१जुलै तसेच भात, ज्वारी बाजरी, मका, नाचणी, रागी, तुर सोयबिन, भुईमुग व सुर्यफुल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठीर क्कम ३०० रुपये व आदिवासी गटासाठी रक्कम १५० रुपये राहिल. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वत:च्या नावावर जमीन असणे व ती जमीन स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरिता स्पर्धकास स्वत:च्या शेतावर स्पर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर. व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर. (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. ही स्पर्धा तालुका स्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुका स्तरावरील पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

अर्ज कुठे करावा व अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : १) विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र -अ) २) ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन ३) सातबारा, ८ -अ चा उतारा ४). जातप्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) ५) पीक स्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा ६) बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

बक्षिसाचे स्वरुप : सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील पिकनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षीस रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

तालुका पातळीवर पहिले बक्षीस ५ हजार रुपये, दुसरे बक्षीस ३ हजार रुपये, तिसरे बक्षीस २ हजार रुपये आहे. जिल्हा पातळीवर पहिले बक्षीस १० हजार रुपये, दुसरे बक्षीस ७ हजार रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये तर राज्य पातळीवर पहिले बक्षीस ५० हजार रुपये, दुसरे बक्षीस ४० हजार रुपये आणि तिसरे बक्षीस ३० हजार रुपये आहे. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, संकेतस्थळ ु.ज्ञीळीहळ.ारहरीरिहीींर.र्सीं.ळप किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. खरीप हंगाम सन २०२४ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून सामान्य रुग्णालयाची पाहणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील बांधकाम, अंतर्गत डागडूजी व इतर कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि. ५) जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, तहसीलदार विजय पवार, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, श्री. येरगुडे, डॉ. जिवने, मार्ड संघटनेचे डॉ. अक्षय वाघमारे आदी उपस्थित होते.

इमारतीमध्ये काही ठिकाणी पाणी गळती होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाने गळतीची कारणे शोधून त्वरीत दुरुस्त करावे. अतिदक्षता विभाग अतिशय सुसज्ज करून लवकरात लवकर वातानुकूलीत यंत्रणा कार्यान्वित करावी. अंतर्गत दुरुस्ती व डागडूजीची काही कामे अजूनही शिल्लक आहेत. ती त्वरीत पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदारांना बांधकाम विभागाने सक्त निर्देश द्यावे. इतर कामांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्यास त्याबाबतचे अंदाजपत्रक त्वरीत सादर करावे. रुग्णालय प्रशासनाने संपूर्ण परिसराची स्वच्छता ठेवावी. पाण्याच्या टाक्या, अंतर्गत नालेसफाई नियमित करावी. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निवासी वसतीगृहात अंतर्गत सुविधा चांगल्या असणे आवश्यक आहे, याबाबत विशेष लक्ष द्यावे. सीटी स्कॅन मशीन बंद राहता कामा नये. दुरुस्तीबाबत संबंधित एजन्सीला निर्देश द्यावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी त्यांनी अपघात विभाग, डे-केअर सेंटर, अतिदक्षता विभाग, प्रसुती विभाग, स्त्रीरोग, बालरोग विभाग तसेच नवजात शिशु अतिदक्षता कक्षाची पाहणी केली.

# अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करा-जिल्हाधिकारी विनय गौडा

## रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा हा अतिशय महत्वाचा विषय आहे. रत्यावर होणारे अपघात व मृत्यु हे मानवनिर्मित असून ते आपण टाळू शकतो. यासाठी सर्वांनी वाहतूक सुरक्षा नियमांचे पालन करणे गरजेचे आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

नियोजन भवन येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय व वाहतूक शाखेच्या वतीने आयोजित रस्ता सुरक्षा सप्ताहाचा समारोप करतांना ते बोलत होते. यावेळी महानगर पालिका आयुक्त विपीन पालीवाल, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, वाहतूक निरीक्षक प्रवीणकुमार पाटील, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम यांच्यासह विद्यार्थी, त्यांचे पालक, आटो-रिक्षा संघटनेचे सदस्य आदी उपस्थित होते.

अपघातामुळे होणा-या मृत्युची संख्या आपल्या देशात जास्त आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, रस्त्यावरीच सुरक्षा अतिशय आवश्यक आहे. अपघातात विनाकारण मृत्यु झाला तर संपूर्ण कुटुंब पोरके होते. ही मानवनिर्मित आपत्ती आहे. नियमांचे पालन केले तर ही आपत्ती आपल्याला टाळता येऊ शकते. रस्ता सुरक्षा सर्व समाजासाठी एक अभियान आहे. आपल्याकडून वाहतुकीच्या नियमांचा भंग होणार नाही तसेच आपल्यामुळे अपघातात कोणी जखमी किंवा कोणाचा मृत्यु होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहनही जिल्हाधिका-यांनी केले.

यावेळी महानगर पालिका आयुक्त श्री. पालीवाल म्हणाले, भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. रस्त्यावरील अपघात ही नैसर्गिक नाही तर मानवनिर्मित आपत्ती आहे. वाहतूक नियमांची माहिती नसणे किंवा जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करणे, हे अतिशय गंभीर आहे. आजचे विद्यार्थी हे भविष्यात वाहन चालविणार आहे. त्यामुळे त्यांना शालेय जीवनापासूनच वाहतुकीच्या नियमांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. परिवहन कार्यालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पुस्तिकेत अतिशय चांगली माहिती आहे. हे नियम शाळेत वाचून दाखविणे गरजेचे आहे. कारण शाळांमधून केवळ विद्यार्थीच नाही तर व्यक्तिमत्व घडले पाहिजे. रस्ता सुरक्षा संस्कार हे शाळेतूनच विद्यार्थ्यांच्या मनात रुजले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. मोरे म्हणाले, रस्ता सुरक्षा अभियान दरवर्षी राबविण्यात येते. रस्ता सुरक्षेची माहिती व जनजागृती करण्यासाठी विभागाच्या वतीने संपूर्ण तालुका स्तरावर निबंध आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांनी रस्ता सुरक्षाबाबत चांगला संदेश दिला आहे. सन २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये जिल्ह्यात अपघातांची संख्या २० टक्क्यांनी कमी झाली. रस्ते अपघात कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण यंत्रणा काम करीत आहे. रस्ता सुरक्षा ही एक सामाजिक चळवळ व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी मान्यवरांच्या हस्ते रस्ता सुरक्षा नियम पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी नियमांचे फलक शाळांना वितरीत करण्यात आले. तत्पूर्वी मान्यवरांनी चित्रकला स्पर्धेतील आकर्षक चित्रांची पाहणी केली.स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार वाटप : प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंध आणि चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यातून शाळा स्तर, केंद्र स्तर आणि तालुका स्तरातून जवळपास ४८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात निबंध स्पर्धेत प्रथम साची दुर्योधन, द्वितीय श्रध्दा वाघ, तृतीय हंसिका गेडाम तर चित्रकला स्पर्धेत केतकी किनेकर प्रथम, साची दुर्योधन द्वितीय आणि रचना नवले तृतीय आली. याशिवाय प्रत्येक तालुकानिहाय सुध्दा दोन्ही स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन शिवाजी विभुते यांनी तर आभार प्रवीण पाटील यांनी मानले. यावेळी प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आनंद निकेतन महाविद्यालय आपल्या गावी

# १२ ग्रामपंचायतींमध्ये ७७३ नागरिकाना दिले योगाभ्यासाचे धडे

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती, वरोरा द्वारा संचलित आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा च्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना याच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय आपल्या गावी उपक्रमांतर्गत योग स्वतःसाठी व समाजाकरिता हा उद्देश पुढे ठेऊन २१ जून २०२४ ते ३ जुलै २०२४ दरम्यान वरोरा तालुक्यातील १२ गावांमध्ये एकूण ७७१ लहान मुलांपासून ते वयोवृध्द नागरिकाना योगाभ्यासाचे धडे योग शिक्षक दीपक शिव यांनी दिले.

माणसाच्या जीवनशैलीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे योग. सुखी आणि समृद्ध जीवनाचा राजमार्ग म्हणजे योग अशी योगाची व्याख्या केली जाते. योगाचे हे ज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचावे जेणेकरून सर्वांचे आयुष्य सुखी आणि समृद्ध होईल या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यात परसोडा, सूर्ला ,बोडखा, सालोरी येन्सा ब्लॉक मजरा खुर्द, खांबाडा , टेमुर्डा, बोपापुर, एकार्जूना , बोर्डा , सालोरी, कोसरसार इत्यादी गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. दिनांक ३ जुलै २०२४ ला उपक्रमाचा समारोप ग्रामपंचायत आनंदवन येथे करण्यात आला. सर्वच गांवामध्ये योग वर्गाचे आयोजन प्राचार्य डॉ मृणाल काळे, उपप्राचार्य राधा सवाने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. तानाजी बायस्कर, प्रा. मोक्षदा नाईक, प्रा.सुरेश राठोड, तुषार पारखी यांनी सर्वच गावातील महाविद्यालयात शिक्षण घेणारे आजी - माजी विद्यार्थी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिकांच्या मदतीने केले.

परसोडा व सुरला ग्रामपंचायत येथे सोमवार, दिनांक २४ जून २०२४ ला हनुमान मंदिर व जिल्हा परिषद शाळेत योग वर्गाचे आयोजन शुभम आमने, रमेश



पावडे उपसरपंच ग्रा. पं. परसोडा सुर्ला ,रवी देसाई - सदस्य, मोहन परचाके, आकाश धगडी - पोलीस पाटील सुर्ला यांनी केले. बुधवार दिनांक २६ जून ला बोडखा व सालोरी येन्सा ब्लॉक मजरा ग्रामपंचायत येथे श्री गुरदेव सेवा मंडळ व जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात बोडखा ग्रामपंचायत चे सरपंच नामदेव थाटे , सदस्य रुपेश तूराळे , गुरुदेव सेवा मंडलाचे परमात्मा पंधरे , समीर तूराळे , अमित कामडी, अंकित थाटे तसेच मजरा ग्रामपंचायत चे प्रमोद तोडासे उपसरपंच मजरा,

सारिका धाबेकर सदस्या तंटामुक्त समिती अध्यक्ष निखिल बोढे व किसन वर्मा सुधीर महातळे युवा समिति सदस्य , दिक्षा धाबेकर, निशा बोढे, निशा सोनटक्के –यांनी केले. गुरुवार दिनांक २७ जून ला खांबडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात ग्रामपंचायत खांबाडा चे सरपंच प्रकाश शेळके, प्रफुल थूटे, उपसरपंच नालिनी थुटे, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल ढाले गावातील प्रतिष्ठित नागरिक गजाननराव धाटे, वैशाली कडुकर, प्रार्थना वाडई यांनी केले. शुक्रवार २८ जून ला टेमूर्डा व बोपापुर ग्रामपंचायत येथे कुणाल दातारकर, अक्षिता तिखट, अंकित तिखट , ग्रामसेवक बोरचाटे, सरपंच सुचिता ठाकरे,उपसरपंच वाटोळे ,सदस्य संगीता तिखट, फकिरचंद कोटांगले, मयूर विरुटकर तसेच गट ग्रामपंचायत खापरी अंतर्गत येणाऱ्या ताडाळा बोपापुर येथे ग्रामपंचायत खापरी चे सरपंच पुष्पा रमेश हिरादेवे, सदस्य मोरेश्वर बालाजी कुतरमारे, पोलीस पाटील प्रतीक अरूण हिरादेवे, आशा वर्कर लिलाताई केशव वासेकर, माजी भारतीय सैनिक रूपेश बालाजी कुतरमारे , आयुष आयुर्वेदिक दवाखाना चिकनी योगा प्रशिक्षक शितल शैलेश मिटकर, विठ्ठल गणपत हिरादेवे तसेच आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन माजी विद्यार्थी तथा राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक रूपेश पांडुरंग कुतरमारे आणि रा से यो स्वयंसेविका कु वैष्णवी प्रमोद कुतरमारे आदि सर्व उपस्थित होते. शनिवार दिनांक २९ जून ला एकर्जुना ग्रामपंचायत येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थना मंदिरात योग वर्गाचे आयोजन राष्ट्रीय खेळाडू मयुर भोयर, कुमुद ढाकुलकर, श्री गुरुदेव सेवा मंडळ एकार्जूना चे सर्व सदस्य, उज्वला थेरे सरपंच, विलास जेनेकर उप सरपंच यांनी केले. रविवार दिनांक ३० जून ला बोर्डा व सोलोरी ग्रामपंचायतीत बोर्डा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शालेत योग वर्ग आयोजना प्रसंगी राहूल ठेंगणे सरपंच बोर्डा ,भूषण बूरीले उपसरपंच ,सुभाषजी ताजने ग्राम विस्तार अधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्वेता लांडे , ग्रामपंचायत सदस्य प्रिया भोयर , गावातील महिला व पुरुष मंडळी उपस्थित होती. तसेच सालोरी येथे सरपंच प्रतिभा शेरकुरे ,उपसरपंच गजानन देहारी ,सदस्य राहुल शेरकुरे ,गुरुदेव व्यायाम प्रसारक क्रीडा मंडळ सालोरी सदस्य पंकज जीवतोडे , अनिकेत जीवतोडे ,अतुल नन्नवरे , तुषार आसेकर, सूरज शेंडे आदी उपस्थित होते. सोमवार दिनांक ०१ जुलै ला ग्रामपंचायत कोसरसार येथे कर्मवीर विद्यालय व जिल्हा परिषद शाळा कोसरसार येथे शाळेचे विद्यार्थी व शाळेचे मुख्याध्यापक ढोबळे ,माहूरे , मोडघरे उपस्थित होत्या तथा कर्मविर विद्यालय कोसरसार शाळेचे संपूर्ण विद्यार्थी व शाळेचे मुख्याध्यापक डांगाले , सागोळले ,नगराळे ,तलमवार , साळवे, लडके , वाकडे , आत्राम उपस्थित होते. तसेच गावातील सरपंच गणेश मडावी,उपसरपंच अमित बहादूरे, ग्रा.प संपूर्ण सदस्यगन, तंटामुक्ती अध्यक्ष नितीन मायकरकार, गणेश उराडे,मयुर बुरांडे,संदिप निबरड,अनुप वरभे, सुयोग भटकर, वैभव कारवटर,करण निमरड उपस्थित होते. ३ जुलै ला ग्रामपंचायत आनंदवन येथे या उपक्रमाचा समारोप करण्यात आला. समारोप समारंभाला ग्रामसेवक खरवडे, सरपंच दरेकर, उपसरपंच शौकत खान, तसेच एनसीसी ऑफिसर, एनसीसी कॅडेट व नागरिक उपस्थित होते.

---

## राऊळगाव येथे रक्तदान शिबीर व शालेय साहित्य वाटप



**बार्शी । प्रतिनिधी**

तालुक्यातील रऊळगाव येथे कै.शहाजी नारायण वाघमोडे पुजारी यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री बालाजी मंदिर रऊळगांव ट्रस्ट व वाघमोडे परिवार यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.यामध्ये ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले त्याचबरोबर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रऊळगांव मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.

यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग धाराशिव मधील श्री हर्षद व्हरकाटे यांच्या हस्ते शिबीराचे उदघाटन करण्यात आले. तसेच राहुल भड, भैय्या मगर, राहुल गुरव, अरूण गवळी, अमोल भोसले , किसन भोसले व वाघमोडे परिवार यांचे कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले.

---

## वरोरा शहरामध्ये डेंग्यूचा डंख ; ७ रुग्णांची नोंद

**वरोरा । प्रतिनिधी**

शहरामध्ये डेंग्यू आजाराने सध्या डोके वर काढले आहे. आत्तापर्यंत



७ बाधित रुग्ण आढळून आले आहेत. तर, अनेक संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. शहरामध्ये ५ जुलै पर्यंत एकूण ७ रुग्णांना डेंग्यूची लागण झाली. यातील ५ रुग्ण हे खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत तर २ रुग्ण हे उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे. सध्या तापाची साथ सुरू असून डेंग्यू रुग्ण आढळल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगर परिषद प्रशासनाकडून याची दखल घेवून उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे . उपजिल्हा रुग्णालयाचे बैधकिय अधीक्षक डॉ. खुजे यांना विचारले असता त्यांनी ही माहिती आमच्या प्रतिनिधींना दिली . शहरातील सर्व पॅथॉलॉजी लॅब चा संयुक्त ग्रुप तयार केला असून त्या माध्यमातून मिळालेल्या माहिती नुसार त्यांनी हा आकडा सांगितला आहे .

---

## आर बी दयावान सामाजिक संस्थेचा वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मोफत शिबिराचे आयोजन

**सोलापूर । प्रतिनिधी**

आर बी दयावान संस्थेचे मार्गदर्शक रजनीकांत बाळशंकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नुकतीच चालू झालेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे मोफत शिबिर भवानी पेठ परिसरामध्ये घेण्यात आले.

भवानी पेठ परिसरात मोलमजुरी करून आपली उपजीविका भागवणारे हजारोच्या संख्येने लोक वास्तव्यास आहेत व या सर्व लोकांना योजनेचा लाभ मिळावा याकरिता शिबिराचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

या शिबिरामध्ये ८९८ नागरिकांचे फॉर्म भरण्यात आले आहे. यावेळी सर्व महिलांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामूहिक वंदना घेण्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रमाकांत बाळशंकर,



आयोजक विश्वभूषण कांबळे, ऑपरेटर रोहित उबाळे, रोहित शिंदे, सम्यक मस्के, बुद्धभूषण कांबळे, विश्वरत्न कांबळे, दीपक भालेराव आदी मान्यवर व परिसरातील महिला उपस्थित होत्या.

---

## खापरी शाळेचे मुख्याध्यापक सेवानिवृत्त



**सेलू । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खापरी येथील मुख्याध्यापक भालचंद्र शंकरराव तपासे यांचा सेवानिवृत्तीनिमित्य सत्कार करण्यात आला .

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी अविरत कार्यरत तपासे यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप जुनघरे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती खापरी ,प्रुमुख अतिथी संगीता महाकाळकर शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती सेलू,प्रमुख पाहुणे प्रिती वैद्य,सरपंच खापरी(शि),अनिल पेंढारकर सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी सुरेश गव्हाळे उपसरपंच खापरी, भगवंत सोर केंद्रप्रमुख सुकळी स्टे,गजानन बुराडे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख,योगेश चापडे,पुरुषौत्तम वैद्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,व हिंगणी केंद्रातर्गत सर्व मुख्याध्यापक व शिक्षकगण उपस्थित होते. प्रास्ताविक संजय देवळीकर मु.अ.खापरी (शि)यांनी केले,संचलन शगजानन झाडे,आभारप्रदर्शन प्रभाकर सोर यांनी केले.

---

## सेलू तालुक्यात ९७० घरकुलाचे बांधकाम सुरू

**सेलू । प्रतिनिधी**

तालुक्यातील ६२ ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या गावामधील नागरिकांना विविध आवस योजनेतून घरकुलाचे लाभ देण्यात आले असून सध्या स्थितीत ९७० घरकुलाचे बांधकाम पूर्णत्वाकडे जात आहे.

विविध आवस योजनेतून १०४५ लाभार्थी कुटुंबांना २३-२४ मध्ये लाभ घेण्यास पात्र ठरविण्यात आले त्या पैकी ९७० लाभार्थ्यांनी घर बांधण्यासाठी सुरुवात केली तर काहीचे घर पूर्ण झाले आहे.यात रमाई आवास योजनेंतर्गत १०४ , शबरी आवस योजनेतून २६६, तर मोदी आवस योजनेतून ६०० घरकुलाचे बांधकाम सुरू आहे .यावर पंचायत समिती नजर ठेऊन असून वेळोवेळी आढावा घेतला जात आहे त्या मुळे १०४५ लाभार्थी पैकी ९७० कुटुंबांना चांगले घर या वर्षात मिळत आहे पण मोदी आवस योजनेतून ६०० घरकुलाचे बांधकाम सुरू असले तरी या



आवस योजनेचे काही हप्ते घरकुल धारकांना मिळाले असले तरी काही हप्ते मिळाले नसल्याने घरकुलाचे बांधकाम रखडल्याचे चित्र ग्रामीण भागात उभे ठाकले आहे.समोर पावसाचे दिवस असल्याने हे बांधकाम रखडणार काय असा प्रश्न उभा ठाकला आहे , तर रोजगार हमीची घरकुल धारकास मजुरी स्वरूपात मिळणारी २४ हजाराची रक्कम ही थांबली आहे मात्र या बाबत पंचायत समितीतील बांधकाम विभागात विचारणा केली असता निधी नसल्यामुळे काही हप्ते द्यायचे आहे ते निधी येताच देण्यात येईल असे सांगण्यात आले. चांगलं घर असावं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध आवास योजनेंतर्गत घरकुलाचे लाभ देण्यात येत आहे या साठी सेलू पंचायत समितीची यंत्रणा यावर देखरेख ठेऊन सहकार्य करीत आहे बहुतांश घरे पूर्ण झाले असून आता पुढील पात्र घरकुल लाभार्थ्यांची यादी काढून उर्वरित लाभार्थ्यांना लाभ द्यावा अशी मागणी होत आहे.

---

## एसएनडीटी महिला विद्यापीठाचा १०९ वा वर्धापन दिन साजर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल बल्लारपूर येथे सुरु झाले आहे. विद्यापीठाला १०८ वर्षे पूर्ण झाले असून १०९ व्या वर्षात विद्यापीठाने प्रवेश केला आहे त्यामुळे बल्लारपूर आवारात विद्यापीठाचा १०९ वा वर्धापन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एस.एन.डी.टी.) हे भारतातीलच नव्हे तर दक्षिण आशियातील पहिले महिला विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी ५ जुलै १९१६ रोजी केली. एस.एन.डी.टी. ची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल काँग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद)



अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी विद्यापीठाला १५ लाख रुपयांची आर्थिक देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ असे झाले.

या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात. आज या विद्यापीठाने ३०० पेक्षा जास्त महाविद्यालयांना संलग्नता दिलेली आहे, सोबतच ७०,००० पेक्षा जास्त विद्यार्थीनी या विद्यापीठात शिक्षणं घेत आहेत. नुकतेच सत्र २०२३-२४ पासून या विद्यापीठाने आपले विस्तार बल्लारपूर या शहरात महर्षी कर्वे महीला सक्षमीकरण ज्ञानसंकुल या नावाने नविन आवार सुरू केलेले आहे, त्यामुळे या दुर्गम भागातील विद्यार्थीनींना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झालेली आहे. येथे जिल्हयाची गरज ओळखून येथील महिलांना सक्षम करण्याच्या अनुषंगाने या आवाराची निर्मिती झाली. विसापूर येथे ५० एकर जागेवर विद्यापीठाची निर्मिती होत असून येथे बांधकाम प्रगतीत आहे.बल्लारपूर आवारातील वर्धापण दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी महर्षी कर्वे महीला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर, चे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून वंदन केले सोबतच सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड , समन्वयक वेदानंद अलमस्त, प्राध्यापक वृंद प्रा. खुशबु जोसेफ , प्रा. श्रृतिका राऊत आणि शिक्षकेतर कर्मचारी आशिष नुगुरवार,वैशाली बोमकंटीवार,ममता भेंडे ,स्नेहा लोहे, मनोज अर्गेलवार यांनी सुद्धा महर्षी धोंडो केशव कर्वे प्रतिमेला आदरांजली वाहिली.

# ठेवीदारांचा गेवराई पोलीस स्टेशनवर अडीच तास ठिय्या

## पूजा मोरेंचा जलसमाधीचा इशारा







**बीड । निलेश उबाळे**

साईराम मल्टिस्टेट व ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये अडकलेले पैसे ठेवीदारांना तात्काळ परत केले जावे यासाठी शुक्रवार दी. ५ जुलै ठेवीदार व खातेदार संघर्ष समितीनं हलगी बजाओ आंदोलन केलं. या प्रकरणात १९ तारखेपर्यंत कारवाई न झाल्यास थेट गोदावरीच्या पात्रात जलसामधी घेण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष व ठेवीदार,खातेदार संघर्ष समितीच्या प्रमुख पूजा मोरे यांनी प्रशासनाला दिला.

बीड जिल्ह्यात ज्ञानराधा मल्टीस्टेट,साईराम मल्टीस्टेट,राजस्थानी मल्टीस्टेट,जिजाऊ मल्टीस्टेट,लक्ष्मी माता अर्बन आणि मराठवाडा अर्बन या मल्टीस्टेटमध्ये हजारो ठेवीदारांनी आपल्या ठेवी ठेवल्या होत्या.परंतु गेल्या सहा महिन्यांपासून या सर्व मल्टीस्टेटला कुलूप लागले आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपयांच्या ठेवी यात अडकून पडल्या आहेत. यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गेवराई पोलीस स्टेशनपर्यंत रॅली काढत, हालगी वाजवत हे आंदोलन केले गेले आहे. यावेळी साईराम मल्टिस्टेटचे साईनाथ परभने व संचालक मंडळ यांना तातडीने अटक करण्यात यावी, साईनाथ परभणे व श्री. सुरेश कुटे यांची, संचालक मंडळाची व नातेवाईकांची मालमत्ता तातडीने जप्त करण्यात यावी व ज्ञानराधा मल्टिस्टेट व साईराम मल्टिस्टेटवर गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येवू नये अश्या मागण्या यावेळी करण्यात आल्या. यामध्ये बहुतांश खातेदार शेतकरी होते. यावेळी पोलीस प्रशासन साईराम मल्टिस्टेटच्या संचालक मंडळाच्या अटकेला उशीर करत असल्याने पोलीस स्टेशनसमोरच ठेवीदारांनीच नारळ फोडून अटकेचा शुभारंभ करा अशी मागणी केली.१९ जुलैपर्यंत मल्टीस्टेट प्रकरणातील आरोपींना अटक झाली नाही, त्यांची मालमत्ता जप्त झाली नाही तर थेट गोदावरीच्या पात्रात जलसमाधी आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा या आंदोलकांच्या नेत्या पूजा मोरे यांनी दिला.

### प्रशासनाला ठेवीदारांचे बळी घ्यायचे आहेत का ? – पूजा मोरे

ठेवीदारांना ,खातेदारांना बिना माय बापाच्या लेकरांसारख या त्या कार्यालयात फिरण्याची वेळ आली आहे. कुणाचे शिक्षण,तर कुणाचे लग्न, दवाखाने पैसे नसल्याने बाकी आहेत मात्र यांना कोणी वालीच नसल्याचे दिसून येतंय. या सर्व मल्टीस्टेटच्या संचालकांना वाचवण्याचे काम प्रशासन करीत आहे.ठेवीदारांनी आत्महत्या केल्याशिवाय प्रशासनाला जाग येणार नाही का? संचालक मंडळावर गुन्हे दाखल होवुनही पोलीस त्यांना अटक का करीत नाही ?त्यांच्या मालमत्ता जप्त का करीत नाहीत ? उलट पोलीस त्यांना संरक्षण देत आहेत का ? असा आरोप पुजा मोरे यांनी केला.

# कृषी दुतांनी शेतकऱ्यांना दिली बियाण्यांची माहिती

**वरोरा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ , अकोला अंतर्गत महारोगी सेवा समिती द्वारे संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन, वरोरा यांच्या विद्यमाने आसाळा येथे शेतकऱ्यांना विविध बियाण्यांच्या प्रकारांबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पोतदार , रावे प्रभारी डॉ. आर. महाजन , रावे समन्वयक डॉ. तायडे आणि मार्गदर्शक डॉ. अकोटकर व डॉ. मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.



या कार्यक्रमात सातव्या सत्रातील विद्यार्थी समिर इंगोले, अजिंक्य गडदे , अभिषेक अघाव, प्रणय घुगुसकर, मोहन अढाव, शिखिल बोरकर आणि आशिष देशमुख यांनी शेतकऱ्यांना बियाणाच्या विविध टॅगची माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना कोणते बियाणे कोणत्या हंगामासाठी योग्य आहे, त्याचे उत्पादन व गुणवत्तेचे फायदे याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांना बियाणांची निवड करताना कोणत्या बाबींची काळजी घ्यावी हे देखील सांगितले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना बियाणांच्या निवडीत मोठी मदत होईल असा विश्वास आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थ्यांनी आणि मार्गदर्शकांनी मोठे परिश्रम घेतले. उपस्थित शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि पुढील काळात असेच शैक्षणीक उपक्रम राबवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# शेतकऱ्यांनी जाणले बोर्डो मिश्रण निर्मितीचे तंत्र

**वरोरा । प्रतिनिधी**

रावे उपक्रमांतर्गत आनंद निकेतन कृषी महाविद्यालयातील कृषिकन्यांनी बोर्डो मिश्रण निर्मिती प्रात्यक्षिकाचे आयोजन सुर्ला या गावी केले.

यावेळी बोर्डो मिश्रण निर्मितीसाठी लागणाऱ्या घटकांची ओळख, बोर्डो मिश्रण निर्मितीची सोपी पद्धती शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे दाखविली. उपस्थित शेतकऱ्यांना कृषिकन्यांनी बोर्डो मिश्रणाचे फायदे समजावून सांगितले.

या प्रात्यक्षिकाचे आयोजन प्रांजली शिंदे,रोहिनी मस्के,तनुजा नंदागवळी,नंदिनी नांदे, फाल्गुनी नन्नावरे,वैष्णवी नेरकर,काव्या पडाला,श्रुती पराते यांनी केले.

या उपक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, रावे प्रभारी डॉ. आर. महाजन, समन्वक डॉ. आर तायडे तज्ञ डॉ पी राखोंडे,डॉ एम जोगी यांचे मार्गदर्शन लाभले.



# कीटकनाशक फवारणीसाठी पीपीई किटचा सुरक्षित वापर

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खेमजाई गावात आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वारोरा यांच्या ग्रामणी कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पीपीई किटच्या सुरक्षित वापरावर प्रक्तशिताचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना पीपीई किटचा योग्य वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

कीटकनाशक फवारणी करताना शेतकऱ्यांनी पीपीई किटमधील हातमोजे, मास्क, गॉगल्स, आणि बूट यांचा योग्य वापर करावा. यामुळे विषारी परिणाम कमी होतात. प्रक्तशितात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष दाखवून पीपीई किटचा वापर कसा करावा याबद्दल सविस्तर माहिती दिली.या प्रात्यक्षिकामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्याचे रक्षण होईल आणि शेतीत अधिक उत्पादनक्षमतेने काम करता येईल. खेमजाई गावातील शेतकऱ्यांनी या प्रक्तशिताचा लाभ घेतला आणि भविष्यात पीपीई किटचा योग्य वापर करण्याचे वचन दिले.आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पोतदार कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. वी. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ.आर. तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रशांत रखोंडे यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांनी आयोजित केला होता. त्यामध्ये विद्यार्थी ओम म्हळसने, शिवशंकर पोफळे, चैतन्य आटे, भगवान मुसले, धम्मदीप तेलसे, आणि पियुष पिंपळे यांचा सहभाग होता.आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या उपक्रमाबद्दल गावकऱ्यांनी अभिनंदन केले आणि आभार मानले.



# दलित पँथरचे संस्थापक राजा ढाले यांनी स्थापित केलेल्या गंधकुटी बुद्ध विहाराची तोडफोड करणाऱ्यांवर कार्यवाही करा

## माजी मंत्री डॉ.नितीन राऊत यांची सभागृहात मागणी

**मुंबई । प्रवीण बागड़े**

दलित पँथरचे संस्थापक आणि आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार ज्येष्ठ विचारवंत नेते राजा ढाले यांनी स्थापित केलेल्या गंधकुटी बुद्ध विहाराची समाजकंटकांनी तोडफोड केली होती. २८ जून रोजी घडलेल्या या घटनेच्या तक्रारीची नोंद अद्यापही घेण्यात आली नाही. प्रकरणी या संदर्भात गुन्हा दाखल करण्याची मागणी आज (५) सभागृहात राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली. राजा ढाले म्हणजे मूर्तिमंत बंडखोरी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्यायाच्या प्रवाहातून तावून सुलाखून निघालेला तत्त्वज्ञ. १९७० च्या दशकात आधी साहित्यातून त्यांनी आपल्यातील बंडखोरीची पहिल्यांदा महाराष्ट्राला ओळख करून दिली. कालकथित राजा ढाले पँथर यांनी ४० वर्षे पूर्वी रमाबाई आंबेडकर हे नाव एका आदर्श स्त्रीचे असून त्या नावाला साधेसे से वर्तन असणारे नगर निर्माण व्हावे या हेतूने व बौध्द धम्माचा निशुल्क प्रसार आणि प्रचार करण्याचा निस्वार्थ भावना ठेवून गंधकुटी विहाराची स्थापना केले असल्याचे यावेळी डॉ. राऊत यांनी म्हंटले.

या विहाराच्या बांधकामापासून ते आजतागायत डागडुजीसाठी लागणारा खर्च स्वतः राजा ढाले व त्यांची पत्नीने केलेला आहे. समाज सेवेच्या हेतूने त्यातून कोणतेही उत्पन्न न घेण्याचा त्यांचा मानस आजतागयत कायम आहे. २८ जून २०२४ रोजी झालेल्या घटनेत ढाले कुटुंबियाने स्थापित केलेली भगवान गौतम बुद्धांची मुर्तीही गायब करण्यात आली आहे. सदर बुध्द विहारचे सर्व कागदपत्रे राजा ढाले व त्यानंतर दिक्षा ढाले यांच्या पत्नीच्या नावे असल्याचे डॉ. राऊत यांनी सभागृहात सांगितले.यावेळी बोलतांना दिंगम्बर पाईकराव या ठेकेदाराने ने कुठलीही शासनाची परवानगी न घेता विहाराची तोडफोड करुन नुकसान केले आहे. घडलेल्या घटनेची तक्रार पंतनगर पोलिस स्टेशन यांना केली असता तक्रारीची नोंद घेण्यात आलेली नाही. प्रसंगी सदर ठेकेदारांसह यात सहभागी सर्व आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी विधिमंडळात डॉ.राऊत यांनी केली.



### आज दीक्षाभूमीची पाहणी करणार

१ जुलै रोजी नागपूरातील दीक्षाभूमीवर घडलेल्या तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनेनंतर आज दिनांक ६ जुलै ला सायं. ५ वाजता राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ.नितीन राऊत भूमिगत पार्किंगच्या स्थळाकरिता पाहणी करुन संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. दीक्षाभूमी येथील अंडरग्राउंड पार्किंगच्या मुद्दा डॉ. राऊत यांनी विधानसभेत लावून धरला होता. दरम्यान, याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात तात्काळ येऊन दिक्षाभूमी येथील पार्किंगच्या कामाला स्थगिती देण्याची घोषणा केली. दरम्यान शनिवारी नागपूर येताच दीक्षाभूमी येथे भेट देऊन पाहणी करणार आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .